सत्यमेव जयते

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे**
(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था)
मुख्यालय : २८ क्वीन्स गार्डन, कॅम्प, पुणे - ४११००१

barti

दूरध्वनी क्र. ०२०-२६३४३६०० / २६३३३३३० /२६३३३३३९ Website:- www.barti.in E-mail: - dg@barti.in


**जाक्र./बार्टी/योजना विभाग/जेईई-नीट/२०२५/७२५९** **दिनांक: ३१/१०/२०२५**

## जेईई (JEE) व नीट (NEET) प्रशिक्षणासाठी निवड झालेल्या उमेदवारांकरिता समुपदेशन पोर्टल (Counseling Poral) मुदतवाढ बाबत महत्वाची सूचना

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, (बार्टी) पुणे मार्फत महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जातीतील (मातंग व इतर तत्सम मांग, मातंग मिनिमादिग, दखनी- मांग, मांग-म्हशी, मदारी, गारुडी, राधेमांग, मांग गारोडी, मांग गारुडी, मादगी व मादिगा या जाती वगळून) उमेदवारांना बार्टी मार्फत जेईई (JEE) व नीट (NEET) परीक्षेचे पूर्व प्रशिक्षण देण्यात येत आहे. त्याअनुषंगाने पुणे, मुंबई, नाशिक, छ. संभाजीनगर, लातूर, अमरावती व नागपूर या ठिकाणी प्रत्येकी जेईई (JEE) प्रशिक्षणासाठी ७५ व नीट (NEET) प्रशिक्षणासाठी ७५ विद्यार्थ्यांची निवड करण्याकरिता बार्टी मार्फत दि.२५/०६/२०२५ रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली. सदर जाहिरातीद्वारे दि.२०/०८/२०२५ पर्यंत ऑनलाईन अर्ज / नोंदणी करण्याबाबत नमूद करण्यात आले होते. त्याअनुषंगाने उमेदवारांच्या प्राप्त ऑनलाईन माहितीच्या आधारे बार्टी मार्फत दि.०४/०९/२०२५ रोजीच्या घोषणापत्रकानुसार पुणे, मुंबई, नाशिक, छ. संभाजीनगर, लातूर, अमरावती व नागपूर या ठिकाणासाठी जेईई (JEE) व नीट (NEET) करिता तात्पुरती निवड यादी व प्रतीक्षा यादी प्रसिद्ध करण्यात आलेली असून विद्यार्थ्यांची कागदपत्राची तपासणी करण्यात आलेली आहे.

दि.०४/०९/२०२५ रोजीच्या घोषणापत्रकानुसार निवड झालेल्या उमेदवारांना त्यांच्या पसंतीची प्रशिक्षण केंद्राची निवड करण्याकरीता ऑनलाईन पोर्टल **https://cpetp.barti.in** तयार करण्यात आलेले आहे. सदर पोर्टलच्या माध्यमातून उमेदवारांनी आपल्या पसंतीची प्रशिक्षण केंद्राची निवड करण्याबाबत दि.२९/१०/२०२५ रोजी बार्टी संर्कतस्तळावर घोषणापत्र प्रसिद्ध करण्यात आले होते. त्यानुसार सदर पोर्टल दि.२९/१०/२०२५ ते दि.३१/१०/२०२५ रोजी पर्यंत उपलब्ध करून देण्यात आले होते. परंतू पोर्टल वर प्रशिक्षण केंद निवडीची अंतिम तारीख दि.३१/१०/२०२५ आहे. तरी सदर घोषणापत्रकाद्वारे दि.०२/११/२०२५ पर्यंत विद्यार्थ्यांना पसंतीची प्रशिक्षण केंद्राची निवड करण्याकरिता मुदतवाढ देण्यात येत आहे.

सदर पोर्टल **शनिवार दि.०१/११/२०२५ पासून रविवार दि.०२/११/२०२५** रोजी पर्यंत सुरू राहील. त्यानंतर कोणत्याही स्वरूपात मुदतवाढ देण्यात येणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

**स्वाक्षरी/-**
**(सुनील वारे)**
**महासंचालक**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन**
**व प्रशिक्षण संस्था, (बार्टी) पुणे**